!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प २००/१२/०३/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# साखर कारखाने व ऊस उत्पादकांच्या हिताचे कोणते निर्णय घेतले ?

**केंद्रिय मंत्री रामविलास पासवान यांना शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांचा लोकसभेत प्रश्न**

**संभाजीनगर : ( ता. १८ )** साखर कारखाने हा सहकार क्षेत्रातील महत्वाचा उद्योग असुन त्याचा विस्तार वृध्दी झाल्यास आपोआप साखर उत्पादक ऊस उत्पादक शेतकरी व उद्योग व्यवसाची प्रगती होईल. यासाठी केंद्र सरकारने गेल्या ३ वर्षातील ऊस खरेदी व साखर उत्पादन, साखर निर्यात, निर्यात शुल्क, या बरोबरच उद्योग यशस्वीतेसाठी कोणती पाऊले उचलित असे ३ प्रश्न शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी अन्न व सार्वजनिक नागरी पुरवठा मंत्री रामविलास पासवान यांना उपस्थित केले.

संबंधीत प्रश्नांना उत्तर देतांनी केंद्रियमंत्री रामविलास पासवान यांनी गेल्या ३ वर्षातील दिलेली आकडेवारी पुढीलप्रमाणे (ऑक्टोंबर ते सप्टेंबर) २०११-१२ वर्षी २५५५.१६ लाख टन ऊस खरेदी व २६३.४३ लाख टन साखर उत्पादन झाले आहे. २०१२-१३ वर्षी २५०१.८३ लाख टन ऊस खरेदी असुन २५१.८३ लाख टन साखर उत्पादन झाली आहे. २०१३-१४ वर्षी २३९७.५२ लाख टन ऊस खरेदी असुन २४५.५४ लाख टन साखर उत्पादन झाली आहे.

सांख्यिकी महानिर्देशाल्य व वाणिज्य असुचना विभाग कलकत्ता साखर निर्यातीची संख्या व निर्यात मुल्य स्पष्ट केले आहेत.

२०११-१२ वर्षी ३६.७३५ लाख टन निर्यात असुन ११३५७.२४ कोटी रुपये किंमत मिळाली. २०१२-१३ वर्षी १२.०२० लाख टन निर्यात असुन ३६१३.८८ कोटी किंमत मिळाली. २०१३-१४ वर्षी २६.८४९ लाख टन निर्यात असुन ७२७७.८१ कोटी किंमत मिळाली होती.

केंद्र सरकार वारंवार साखर कारखाना गळीत हंगामासाठी तसेच व्यवसाय वाढीसाठी साखर विकास निधी (एस.डी.एफ)व्दारे सवलती व कर्ज देत असते. गेल्या ४ वर्षापासुन ऊस उत्पादन व साखरेचे उत्पादनाचे प्रमाण वाढत असुन या बरोबरच अधुनिकीकरण, यंत्र साम्रुगी, सिंचन, विकसित ऊस बीज यासाठी नेहमी केंद्र सरकार प्रयत्नशिल राहिल असे वचन केंद्रिय मंत्री रामविलास पासवान यांनी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांना दिले.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ.**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400